# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## उपकेंद्र सहाय्यक पदांच्या भरती साठी ऑनलाईन परीक्षा- जाहिरात क्र. ०२/२०२०

## माहिती पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्त्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यास मदत व्हावी म्हणून उमेदवारास या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविलेल्याप्रमाणे सर्वसाधारणपणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या (Objective Type) बहुपर्यायी प्रश्न असतील :-

| अनु.क्र. | प्रश्नावलीचे नाव | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | एकत्रित वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | टेक्निकल कॉम्पिटन्सी (तांत्रिकीय क्षमता) | ५० | ७० | मराठी | १२० मिनिटे |
| २ | सामान्य अभियोग्यता | २० | १० | | |
| ३ | मुलभुत अंकगणितीय योग्यता | २० | २० | | |
| | **एकूण** | **९०** | **१००** | | |

ऑनलाईन परीक्षेसाठी १२० मिनिटांचा अवधी असेल. परिक्षेचे माध्यम मराठी राहील. उमेदवारास ऑनलाईन परिक्षेसाठी दिलेल्या १२० मिनिटामध्ये कोणत्याही वेळी १ ते ९० मधील कोणताही प्रश्न उमेदवार सोडवू शकतात. सर्व प्रश्नांना बहुपर्याय उत्तरे असतील. प्रश्नासाठीच्या पाच पर्यायापैकी फक्त एकच अचूक उत्तर असेल. उमेदवारास सर्वाधिक अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक $' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. उमेदवारांकडून चुकीचे उत्तर दिल्या गेलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी त्या प्रश्नासाठी निर्धारित केलेल्या गुणांच्या एक चतुर्थांश गुण कमी केले जातील.

ऑनलाईन परिक्षेचे गुण पुढील प्रक्रियेचा स्विकार करून प्राप्त करण्यात येतील.

(i) वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये उमेदवारोने बरोबर उत्तर दिलेल्या प्रश्नांची संख्या, बरोबर गुण देण्याचा निर्णय घेतांना विचारात घेतली जाईल.

(ii) उमेदवाराने अशा प्रकारे प्राप्त केलेले बरोबर गुण, समीकृत गुणांबाबत निर्णय घेण्याकरीता विविध सत्रांमध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये आवश्यकता भासल्यास, शंका असल्यास किरकोळ बदलाची दखल घेण्याकरीता सममूल्य करण्यात येतील.*

* कोणत्याही चाचणीमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेले गुण, सर्व नमुन्याच्या (form) गुणांच्या वितरणाचा विचार करून मुळ प्रकाराशी समीकृत आहेत.

(iii) एकुण गुण, दोन अंकापर्यत दशांश बिंदुसह कळविण्यात येतील.

कृपया ध्यानात घ्या की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद न केलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.

काही नमुना प्रश्न खाली दिले आहेत.

**टेक्निकल कॉम्पिटन्सी (तांत्रिकिय क्षमता)**
**या वरील विषयातील विशेष ज्ञानावर आधारित असतील.**

## सामान्य अभियोग्यता

ही चाचणी तुम्ही किती त्वरेने आणि अचूकपणे विचार करु शकता त्याचे मापन करते. ह्या चाचणीत तर्कशक्ती, विश्लेषणात्मक योग्यता, कार्यकारण भावात्मक विचार करणे इत्यादिंवर आधारीत प्रश्न असतील. खालील नमुना प्रश्न अभ्यासा.

**प्र.1.** काही नेते अप्रामाणिक असतात. सत्यप्रीय हा नेता आहे ? या दोन विधानांवरुन खालीलपैकी कोणता निष्कर्ष निश्चितपणे निघतो ?
(1) सत्यप्रीय प्रामाणिक आहे. (2) सत्यप्रीय अप्रामाणिक आहे.
(3) काही नेते प्रामाणिक असतात. (4) नेते हे सामान्यतः अप्रामाणिक असतात.
(5) सत्यप्रीय हा काही वेळ अप्रामाणिक असतो

**प्र. 2.** TOPS या शब्दाच्या अक्षरांना 'O' ने प्रारंभ करुन रचल्याने जर का एक अर्थपूर्ण शब्द बनविता येत असेल तर त्या शब्दाचे अंतिम अक्षर हे तुम्ही उत्तर म्हणून दर्शवा. जर का असे एकाहून अधिक शब्द बनविता येत असतील तर उत्तर म्हणून 'M' दर्शवा आणि असा एकही अर्थपूर्ण शब्द बनविता येणे शक्य नसल्यास उत्तर 'X' दर्शवा.
(1) T (2) P (3) S (4) M (5) X

**प्र. 3.** मुलांच्या एका रांगेत महेश रांगेच्या डावीकडून सातवा आणि उजवीकडून अठरावा आहे. त्या रांगेत एकूण किती मुले आहेत ?
(1) 26 (2) 25 (3) 27 (4) निश्चित सांगता येत नाही (5) यापैकी एकही नाही

**प्र. 4.** खालील पाचांपैकी चार एका निश्चित प्रकारे सारखे आहेत आणि म्हणून त्यांचा एक गट बनतो. त्या गटात न येणारा पांचवा कोणता ?
(1) किलोग्रम (2) किलोमीटर (3) इंच (4) फूट (5) यार्ड

## मुलभुत अंकगणितीय योग्यता

**ही चाचणी तुम्ही अंकात्मक क्रिया म्हणजेच मोजणे, सांख्यिकीय तर्कशक्ती, कोष्टक आणि आलेख यांचा अर्थ स्पष्ट करणे इ. किती जलद आणि अचूकपणे करु शकता याचे मापन करते.**

**निर्देश : खालील प्रत्येक प्रश्नात एक संख्या दिलेली नाही. त्या न दिलेल्या संख्येच्या जागी प्रश्नचिन्ह (?) दर्शविले आहे. तुम्हाला (1), (2), (3) आणि (4) या उत्तरांपैकी कोणते उत्तर प्रश्नचिह्नाच्या जागी येऊ शकते ते शोधावयाचे आहे. जर का ह्या चारांपैकी एक ही प्रश्न चिह्नाच्या जागी येऊ शकत नसेल तर यापैकी एकही नाही म्हणजे उत्तर क्र. (5) हे उत्तर तुम्ही दर्शवाल.**Error! Bookmark not defined.

**प्र. 1.** 42 + 73 + 137 = ?
(1) 352 (2) 252 (3) 242 (4) 142 (5) यापैकी एकही नाही

**प्र. 2.** $20 \times \frac{1}{2} = ?$
(1) 4 (2) 5 (3) 12 (4) 20 (5) यापैकी एकही नाही

काही प्रश्नांसाठी अंकगणितीय तर्कशक्तीची आवश्यकता असते. उदाहरणार्थ -

**प्र. 3.** जर एका लिंबाला 10 पैसे तर 6 लिंबांची किमत किती पैसे ?
(1) 6 (2) 10 (3) 60 (4) 61 (5) यापैकी एकही नाही

**प्र. 4.** खालीलपैकी कोणत्या संख्येस 4 ने निःशेष भाग जातो ?
(1) 27114 (2) 58204 (3) 48402 (4) 32286 (5) यापैकी एकही नाही

**प्र. 5.** जर एक पेन 10 रुपयांना विकल्याने त्याच्या खरेदीच्या किमतीइतकाच नफा होत असेल तर त्या पेनची खरेदीची किमत किती?
(1) 3 रुपये (2) 5 रुपये (3) 10 रुपये (4) 20 रुपये (5) यापैकी एकही नाही

**(अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :**

(1) परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) सर्व प्रश्नावल्या मराठीत असतील.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पांच, उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला सर्वाधिक उचित उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(4) सर्वर मध्ये घडयाळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणकाच्या पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घडयाळाची वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतः होऊन परीक्षा संपवण्याची किवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला क्वेश्चन पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले **नाही,** परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.

पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. "जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल."

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. ध्यानात घ्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी व पडताळणी साठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर वगळण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. "जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये धरले जाईल."

(12) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) सुरक्षित केलेले प्रश्न किवा उत्तर दर्शवल्यानंतर पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) ह्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग पटलाच्या (screen) वरच्या पट्टिकेवर (bar) दर्शवले आहेत. एखाद्या विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला आहे.

(15) एखाद्या विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप पुढच्या विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(16) एखाद्या विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(17) तुमच्या सोईनुसार तुम्ही परीक्षेच्या कालावधीत केव्हाही विभाग आणि त्यांतील प्रश्नांकडे जाऊ-येऊ शकता.

(18) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर का एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार गणला जाईल आणि असा परीक्षार्थी कंपनी ने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(19) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे समाधान केले जाणार नाही.

(20) 120 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

(21) **कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेचा वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सबमिट' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थीने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करावयाची नाही, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल**

## (ब) सर्वसामान्य सूचना

(१) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची नोंद घ्यावी.

(२) सदर परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाईल. ऑनलाईन परीक्षेच्या स्थळात (site) प्रवेश करण्यासाठी आपणास दिलेला User Name/Password नमूद करावा लागेल. संगणकाच्या पडद्यावर दिसणारे तुमचे नांव आणि इतर तपशील बरोबर आहे याची पडताळणी करावी. याबाबत तफावत आढळल्यास पर्यवेक्षकाच्या निदर्शनास आणून द्यावी. आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेला User Name/ Password बाबत गुप्तता पाळणे आवश्यक आहे.

(३) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सध्या कायदेशीरपणे स्विकारण्यायोग्य मुळ स्वरुपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नाव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) व ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर का प्रवेश पत्रावरील फोटो/नाव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/शपथपत्र उपस्थित केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(४) **परीक्षेस येताना आपल्या सोबत अद्ययावत फोटो चिटकवलेले प्रवेशपत्र आणि सध्या कायदेशीरपणे स्वीकारणे योग्य मूळ स्वरुपातील स्वत:च्या ओळखीचा पुरावा व त्याची एक छायांकीत प्रत (जसे की, स्वत:चे आधार कार्ड/ ई-आधार/ पॅन कार्ड/ पारपत्र/ वाहन चालक परवाना/ निवडणूक आयोगाचे ओळखपत्र/ गॅजेटेड अधिकाऱ्याचा किंवा लोकप्रतिनिधीच्या सहीचे मूळ लेटरहेडवरील उमेदवाराचा फोटो असलेले नजीकच्या काळाचे ओळखपत्र/ बार कॉन्सिल ओळखपत्र/ मान्यताप्राप्त महाविद्यालयाने दिलेले चालू वर्षासाठीचे ओळखपत्र/ कर्मचारी ओळखपत्र) आणावे. कृपया लक्षात घ्या-रेशनकार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारला जाणार नाही. मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकीत प्रती अथवा कलर झेरॉक्स सादर केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही व उमेदवारास परिक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल. उमेदवाराने परिक्षेच्यावेळी प्रवेश प्रमाणपत्र व उपरोक्त नमूद केलेल्या ओळखपत्रापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र व ओळखपत्राची छायांकीत प्रत सादर करावा्यात. अन्यथा त्याचा परिक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल याची उमेदवारांनी जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.**

(५) प्रवेशपत्रावर नमूद वेळेच्या १५ मिनिटे अगोदर परीक्षा स्थानी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. **परीक्षा कक्षामध्ये विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.** परीक्षा सुरु झाल्यानंतर ते परीक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी पर्यवेक्षकाच्या अनुमतीशिवाय परीक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(६) उमेदवाराने सोबत प्रवेश प्रमाणपत्र, मूळ ओळखपत्र व त्याची छायांकीत प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्य, **बॉल पॉइंट पेन आणि स्टँप इंक पॅड आणावयाचे आहे**. कच्चे काम करण्यासाठी कागद पुरवला जाईल. परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेश पत्रासह ड्रॉप बॉक्स मध्ये टाकावे लागतील.

(७) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या स्थानाची निश्चिती करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षास्थानी जावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे वेळेवर (प्रवेश पत्रावर छापलेल्या) पोहोचू शकाल.

(८) परीक्षास्थानी तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि कंपनी चे प्रतिनिधि यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. त्यांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन केल्यास उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही तसेच त्यांची उमेदवारी रद्द केली जाईल.

(९) **डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाइल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्ल्यूटूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरणे योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वह्या, नोट्स, पुस्तके, बॅग्स, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारचे साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत: जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे, असे आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरविले जाईल. सदर नमूद केलेली अनधिकृत साधन/ साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/ साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.**

(१०) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागामध्ये उघड करणे, प्रकाशीत करणे, पुन्हा निर्माण करणे, ट्रासमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षा केंद्रामध्ये दिला जाणारा कागद घेऊन जाणारे, किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(११) बरोबर आणि चुकीच्या उत्तरांमधील सारखेपणाचे आकृतीबंध उघडकीस आणण्यासाठी तुमच्या प्रतिसादांचे (उत्तरांचे) अन्य उमेदवारांच्या प्रतिसादांबरोबर विश्लेषण केले जाईल. ह्या संदर्भात वापरलेल्या विश्लेषणात्मक पध्दतीमध्ये जर का असे अनुमान निघाले/आढळून आले की, प्रतिसादांचे आदान प्रदान झालेले आहे अणि मिळवलेले गुण हे यथार्थ/ स्विकारण्यायोग्य नाहीत, तर तुमची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

(१२) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये ऐनवेळीस काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येणार नाही. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णत: प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुसऱ्या जागेस हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे याबाबतचा निर्णय हा परीक्षा घेणाऱ्या संस्थेचा/ मंडळाचा निर्णय अंतिम राहील. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करणार नाही. या विलंबीत झालेल्या प्रक्रियेस उमेदवार एका जागेवरून दुसऱ्या जागेवर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधुन संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(१३) जर का परीक्षा एकाहून अधिक सत्रात घेतली गेली, तर वेगवेगळया सत्रात वापरलेल्या प्रश्नमालिकांच्या काठिण्यपातळीतील किंचित फरकांशी, जुळवून घेण्यासाठी विविध सत्रातील प्राप्तांकांना इक्वेट केले जाईल.जर का नोड क्षमता कमी असेल किंवा एखादया केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवाराच्या बाबतीत काही तांत्रिक बिघाड घडला तर एकाहून अधिक सत्रांची आवश्यकता निर्माण होते.

(१४) एखाद्या उमेदवारास एकाहून अधिक आवेदन पत्रे मिळाली असतील तर तो/ती परीक्षेस एकदाच बसू शकतो/ ते आणि उर्वरीत आवेदन पत्रे परत करावी लागतील.

(१५) आपणास सदर परीक्षेस स्व:खर्चाने यावे लागेल आणि कोणताही प्रवास खर्च/ भत्ता दिला जाणार नाही.

## SOCIAL DISTANCING MODE CONDUCT OF EXAM RELATED INSTRUCTIONS

1 **Candidate is required to report at the exam venue strictly as per the time slot mentioned in the Call Letter AND/OR informed via SMS/Mail on their registered mobile number/mail prior to exam date. It is expected that candidate strictly adhere to this time slot – as entry into the exam venue will be provided based upon the individual's time slot ONLY. Candidates should report atleast 15 minutes before the Reporting time indicated on the call Letter.**

2 **Mapping of 'Candidate Roll Number and the Lab Number' will NOT be displayed outside the exam venue, but the same will be intimated to the candidates individually at the time of entry of the candidate to the exam venue.**

3 Items permitted into the venue for Candidates
**Candidates will be permitted to carry only certain items with them into the venue.**
   a. **Mask (WEARING A MASK is COMPULSORY)**
   b. **Gloves**
   c. **Personal transparent water bottle (Candidate should bring his / her own water bottle)**
   d. **Personal hand sanitizer (50 ml)**
   e. **A simple pen & one ink stamp pad**
   f. **Exam related documents (Call Letter and Photocopy of the ID card stapled with it, ID Card in Original.)**
   g. **Call Letter should be brought with the Photocopy of the Photo ID stapled with it. Original ID (same as Photocopy) is also to be brought for verification. The name on the ID and on the Call Letter should be exactly the same.**
   h. **In case of Scribe Candidates - Scribe form duly filled and signed with Photograph affixed.**

**No other Items are permitted inside the venue.**

4 **Candidate should not share any of their personal belonging/material with anyone**

5 **Candidate should maintain safe social distance with one another.**

6 **Candidate should stand in the row as per the instructions provided at venue.**

7 **If candidate is availing services of a scribe, then scribe also should bring their own Gloves, N95 Mask, sanitizer (50ml) and transparent water bottle. Wearing a mask is compulsory. Both candidate and Scribe will require to be wearing N95 Mask.**

8 **A Candidate must have AarogyaSetu App installed on his mobile phone. The AarogyaSetu status must show candidate's risk factor. A candidate will have to display this status to the Security Guard at the entry into the exam venue. In case a candidate does not have a smart phone, he/she will have to bring in a signed declaration to this effect (declaration is provided along with this Call Letter) and show the same to the Security Guard at the entry into the exam venue. Candidates with Moderate or High Risk Status on AarogyaSetu App will not be allowed entry. In case any of the responses in declaration suggest COVID 19 infection/symptoms, the candidate will not be permitted inside the exam venue. (If candidate is availing services of a Scribe, then Scribe should also follow the same instructions.)**

9 **After AarogyaSetu status display at the entry gate, candidates will be required to switch off their mobile phones, and deposit it at the designated location, to be collected while exiting.**

10 **All candidates (and Scribe, if applicable) will be checked with Thermo guns at the entry point for temperature. In case, any person is observed to be having above normal temperature (> 99.14° F) or displaying any symptoms of the virus, they will not be allowed to enter into the venue.**

11 In candidate registration :
   a. **Candidate registration will be done through photo capture. Photo captured will be matched with the photo uploaded by you in the application (as printed in the call letter). You must NOT change your appearance from the photo uploaded by you.**
   b. **Photograph will be taken while candidate is standing.**
   c. **Seat number will be given to the candidate.**

12 Rough sheet, call letter and ID proof management
- **Rough sheet(s) kept at each candidate desk will be used by candidate.**
- **Candidate must follow the instructions related to dropping the call letter with the ID proof copy in the boxes provided at the exit of lab/venue while leaving or at the designated place. Those candidates who avail the services of Scribe should submit Scribe form also along with the Call Letter and ID proof copy.**
- **Candidate must drop the rough sheets, call letter, ID proof copy in the boxes provided at the exit of lab/venue while leaving or at the designated place indicated by Exam officials.**

13 Post Examination Controls
- **On completion of examination, the candidates should move out in an orderly manner without crowding as instructed by the venue staff.**

**परिक्षेसाठी शुभेच्छा**